राज्यातील ५ जिल्हा परिषदा व ३६ पंचायत समित्यांमधील सार्वत्रिक निवडणूका-२०१९ मतदार यादी तयार करण्याबाबतचे आदेश

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक:-रानिआ/जिपपस/२०१९/प्र.क्र.११/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३१/०५/२०१९

प्रति,
जिल्हाधिकारी,
धुळे , नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर

विषय :- धुळे , नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर ५ जिल्हा परिषदा व त्यातंर्गत ३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका-२०१९ मतदार यादी तयार करण्याबाबतचे आदेश

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस२०१८/ प्र.क्र.१२/का.७, दिनांक २६/०३/२०१९ व ७/०५/२०१९
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/ जिपपंस-२०१९/ प्र.क्र.०६/का.७, दिनांक ३० /०३/२०१९ व दिनांक ७/०५/२०१९
३) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/ जिपपंस-२०१९/ प्र.क्र.७/का.७, दिनांक ३० /०३/२०१९ व दिनांक ७/०५/२०१९
४) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/ जिपपंस-२०१९/ प्र.क्र.०५/का.७, दिनांक ३०/०३/२०१९ व दिनांक ७/०५/२०१९
५) ) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१९/ प्र.क्र.०८/का.७, दिनांक ३०/०३/२०१९ व दिनांक ७/०५/२०१९
६) राज्य निवडणूक आयोगाचे क्र.सानिआ/मनपा-२०१९/प्र.क्र०३/ का.५, दिनांक ०७/०५/२०१९ ची अधिसूचना

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भाधिन अ.क्र.१ ते ५ समोरील दि. २६/०३/२०१९ व दि.३०/०३/२०१९ व दि. ०७/०५/२०१९ च्या पत्रान्वये धुळे, नंदुरबार, अकोला, वाशिम व नागपूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ३६ पंचायत समित्यांच्या निवडणूकीसाठी प्रभाग रचना व आरक्षण सोडतीचा कार्यक्रम देण्यात आला असून दि.१७/०५/२०१९ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

२.	स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोग स्वतंत्रपणे मतदार यादी तयार करत नसून भारत निवडणूक आयोगाकडून तयार होणारी विधानसभेची मतदार यादीच वापरण्यात येते. याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत व संभाव्य मतदानाचा दिनांक लक्षात घेवून मतदार यादी तयार करण्यासाठी एक विशिष्ट दिनांक (Cut off Date) अधिसूचित केला जातो. (जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ चा कलम १३)

३.	या निवडणूकांची मतदार यादी तयार करण्यासाठी **दिनांक १०/०४/२०१९** हा दिनांक (Cut off Date) जाहिर केला असून त्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम,१९६१, कलम १३ मधील तरतुदीनुसार आयोगाने संदर्भांकित अ.क्र. ०६ समोरील क्र. रानिआ/मनपा-२०१९/प्र.क्र.०३/का.५, दिनांक ०७/०५/२०१९ रोजी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. (प्रत संलग्न)

४.	उक्त ५ जिल्हा परिषदा व त्याअतंर्गत ३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता जिल्हा परिषदेसाठी निवडणूक विभागनिहाय व पंचायत समित्यांसाठी निर्वाचक गणनिहाय विभाजन करण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

**आदेश**

५.	मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती - दिनांक०१/०१/२०१९ हा अर्हता दिनांक धरुन भारत निवडणूक आयोगाकडून दिनांक १०/०४/२०१९ रोजी प्रसिध्द झालेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी उक्त ५ जिल्हा परिषदा व त्याअतंर्गत ३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी वापरण्यात येईल.

६.	वरील मतदार यादी ग्राहय धरुन जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील अनुक्रमे परिशिष्ट २ मध्ये नमूद निवडणूक विभाग व निर्वाचक गणांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम परिशिष्ट १ प्रमाणे राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : | दिनांक ०७/०६/२०१९ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : | दिनांक ०७/०६/२०१९ ते १२/०६/२०१९ |
| (iii) | प्रभागनिहाय मतदार याद्या अंतिम व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे | : | दिनांक १५ /०६/२०१९ |
| (iv) | मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | : | दिनांक १८/०६/२०१९ |

